॥श्री॥

## ॥ हरिमीडे ॥

भगवद् पूज्यपाद श्रीमद् आद्य शंकराचार्यांनी रचलेले हे मत्तमयूर वृत्तातील हे हरिमीडे स्तोत्रही अतिशय महत्त्वाचे व उत्तम मानले जाते. उपनिषदातील महत्त्वाच्या भागाचे यात वर्णन आढळते. या स्तोत्रामध्ये भक्ति व तत्त्वज्ञान यांचा मधुर मिलाफ पहायला मिळतो. स्वस्वरूपाच्या आविष्काराने जीवांची सर्व दुःखे हरण करणारा तो हरि म्हणजेच परब्रह्म परमात्मा! आणि त्याची मी 'ईडे' म्हणजे स्तुति करत आहे. याला हरिस्तुति असेही म्हणतात.

सूत्रमय भाषेत परंतु तरीही अतिशय मधुर असे हे स्तोत्र आहे. काव्य, रसार्द्रता, परतत्त्व स्पर्श हे याचे घटक आहेत. तरीही वैराग्याचा आविष्कार आहे.

अद्वैत तत्त्वज्ञानाचा गाभा – वैराग्य + उपदेश + ज्ञान

SUNDAY 16

© www.madhaveeraghuveer.com

स्तोष्ये भक्त्या विष्णुमनादिं जगदादिं
यस्मिन्नेतद् संसृतिचक्रं भ्रमतीत्थम् ।
यस्मिन् दृष्टे नश्यति तत् संसृतिचक्रं
तं संसारध्वान्तविनाशं हरिमीडे ॥१॥

संपूर्ण जगाचे आदिकारण असणाऱ्या परंतु ज्याचे कोणतेही आदिकारण नाही, अशा अनादि विष्णुच्या ठिकाणी, हे संसारचक्र परिभ्रमण करत असल्याचे आपण पाहतो, त्या विष्णुची मी भक्तिपूर्वक स्तुति करत आहे.
ज्याचे दर्शन झाले असता (सति सप्तमी) हे संसारचक्र नाश पावते त्या संसाररूपी अंधकाराचा नाश करणाऱ्या हरिची मी स्तुति करत आहे.

विष्णु - विश् - प्रवेश करणारा. निमित्त कारण व उपादान कारण — माती व कुंभार तोच आहे.
सुवर्ण व अलंकार (सोनार) तोच आहे. कोळी ज्याप्रमाणे आपल्याच शरीरातून चिकट द्रव बाहेर काढतो व त्याचेच जाळे बनवतो. तो मायोपाधिक ब्रह्मचैतन्य आहे. म्हणजेच विष्णु आहे.
असे असले तरी तो स्वतः मात्र अनादि म्हणजेच कारणरहित आहे. तो कोणापासून उत्पन्न झालेला नाही. तो सर्वांपलीकडे आहे. त्याला जन्म नाही. ∴ तो अज, अनादि आहे. परंतु त्याच्या ठिकाणी हे संसारचक्र फिरत आहे असे आम्हाला भासते.

संसरति जीवः अनया इति संसारः ।

इकडे तर अज्ञान, मोह, वासना यांच्या बंधामुळे जीव इकडे तिकडे भटकत असतो. सुख दुःखे भोगत असतो.

© www.madhaveerachuveer.com

Prabhakar T Hardikar
759/16 Deccan Gymkhana Colony
D. G.
Pune 411004
7028051455


अहंकारातून कर्म घडते. कर्मातून वासना – कर्माची फळे भोगण्यासाठी पुन्हा जन्म घ्यावा लागतो. पुन्हा अहंकार – पुन्हा कर्म – पुन्हा जन्म अशा संसारचक्राचे अधिष्ठान परमात्मा आहे. व अनंत दुःखे भोगणारा तो जीवात्मा आहे.

मयाध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम्।

वस्तुतः जीवात्मा हा परमात्मस्वरूपाहून भिन्न नाही. परंतु अज्ञानाने कल्पिलेल्या अहंकारामुळे तो स्वतःला परमात्मस्वरूपाहून भिन्न समजतो व संसारचक्रात गुरफटत राहून दुःख भोगतो. मात्र या विश्वप्रपंचाचे अधिष्ठान असणाऱ्या परमात्मतत्त्वाचा साक्षात्कार झाला की त्याच्या पुरते हे संसारचक्र थांबते. व दुःखपरिहार होतो. त्याचे दर्शन झाले की अज्ञानातून निर्माण झालेला विश्वप्रपंच मावळतो, अहंकाराचा नाश होतो.

नवल उदेला चंडांशु। मावळवीत विश्वाभासु)

एकदा सूर्य उगवला की अंधाराचे अस्तित्व उरत नाही. संसाराला कारणीभूत असणाऱ्या अज्ञानरूपी स्वप्नाच्या म्हणजे अंधकाराचा समूळ नाश होतो. व सर्वत्र लखलखीत प्रकाशाचे साम्राज्य पसरते.

© www.madhaveerachiveer.com

यस्यैकांशादित्थमशेषं जगदेतत्
प्राादुर्भूतं येन पिनद्धं पुनरित्थम्।
येन व्याप्तं येन विबुद्धं सुखदुःखै
स्तं संसारध्वान्तविनाशं हरिमीडे ॥२॥

ज्याच्या एका अंशापासून हे भोक्ता-भोग्य-भोग किंवा द्रष्टा-दृश्य-दर्शन अशा विविध रूपांनी हे जग प्रतीत होते. हे उत्पन्न झालेले जग ज्याने स्वधर्माच्या नियमांनी दृढबद्ध केले आहे. ज्याचे सुचारु व्यवस्थापन तो करत आहे. ज्यानेच हे सर्व विश्व व्यापून टाकले आहे. पूर्ण भरले आहे. हे सुखदुःखाने भरलेले जग जो प्रकाशित करतो आहे. अशा या संसाराचे मूळ असणाऱ्या अज्ञानरूपी अंधकाराला जो पूर्णपणे नाहीसा करतो, अशा श्रीहरिची मी अनन्यभावाने स्तुति करत आहे.

पहिल्या श्लोकात सांगितल्याप्रमाणे परमात्मा हा जगताचे आदिकारण आहे. परंतु त्यावर आक्षेप आहेत

१. तो वेगळा व जग वेगळे असे म्हटले तर दोन गोष्टी म्हणजेच द्वैत मानावे लागते.

२. बरं! तो स्वतःच नाना रूपाने नटला असे म्हणावे तर निर्विकार, निरवयव, एकरूप असणाऱ्या परमात्मामध्ये अनेकता कशी निर्माण झाली?

३. शिवाय, ते परब्रह्म सर्वांशाने जगाच्या रूपाने नटले की एकांशाने नटले? ते जर सर्वांशाने नटले असे म्हणावे तर मग मुक्त लोकांना रहाण्यासाठी आनंदमय असे स्थानच उरणार नाही. कारण जगामध्ये सुख थोडे व दुःख फार आहे. आणि मुक्त लोकांसाठी तर निष्प्रपंच ब्रह्म हेच रमणीय व विश्रांतीचे स्थान आहे.

४. आणि ते एकांशाने नटले म्हणावे तर ब्रह्म निरवयव निष्कळ आहे. त्याचे तुकडे (अंश) करता येत नाहीत.

मग त्या परमात्म्यापासून हे जग निर्माण तरी कसे झाले?

© www.madhaveeraghuveer.com

जैसे ज्याचे कर्म तैसे फळ देतो रे ईश्वर।



या सर्व प्रश्नांची उत्तरे या श्लोकात मिळतील ----
इथे दुर्जना, वैर तर निश्चितच नाही.

रज्जु सर्प न्याय — मेडीवाकडी पडलेली एकच दोरी कुणाला सापाप्रमाणे, कुणाला माळेप्रमाणे, कुणाला ओहळाप्रमाणे तर कुणाला फकिराच्या काठीप्रमाणे भासते. खरे तर दोरी एकच असूनही अनेकत्वाने भासते. त्याचप्रमाणे एकच ब्रह्म जीवाच्या अदृष्ट संस्कारांमुळे अनेकाकार बनते तरी ते स्वरूपत: एकरूप व निर्विकारच असते.

अज्ञानाच्या शक्ति दोन ----- आवरण व विक्षेप --

<u>आवरण</u> - यथार्थ स्वरूपाला झाकून टाकते.

<u>विक्षेप</u> — असलेल्या पदार्थाच्या ठिकाणी दुसरेच काही भासवते.

सारांश काय, तर कोणत्याही पदार्थाचे मूळ स्वरूप झाकणे, ते प्रतीतीला येऊ न देणे हे अज्ञानाचे कार्य।

मंद अंधकारात दोरीची यथार्थ कल्पना येऊ न देणे हे अज्ञानाच्या आवरणशक्तीचे कार्य आहे. तर दोरीच्या ठिकाणी सर्प, माळा, ओहळ, काठी अशा पदार्थांची कल्पना करणे हे विक्षेपशक्तीचे कार्य आहे.

आकाशाला अंश नाहीत तसेच परब्रह्मालाही अंश नाहीत, तरीदेखील घटाकाश - मठाकाश - महदाकाश - विभागणी होते.

तो परमेश्वर सर्वांना सुखी का करत नाही? खरे तर, तो कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् असे सामर्थ्य असणारा आहे. तो काहीही करू शकतो. त्याच्या ठिकाणी वैषम्य/नैर्घृण्य नाही. तो समवृत्ति आहे. दयेचा सागर आहे.

ईश्वरस्तु पर्जन्यवत् द्रष्टव्य:। — पाऊस सगळीकडे सारखाच पडला तरी वनस्पतीच्या गुणधर्मानुसार त्यांच्यात चवीत फरक पडतो. गुणधर्मातील वैषम्याचा फरक संबंध निश्चितच पर्जन्याकडे नाही. — यथा बीज तथांकुर:।

जशी कर्मे तशी फळे। तो Ocean of Mercy आहे न्यायाधीश अपराध्याप्रमाणे शिक्षा देतो. तो निष्ठुर नसतो तो जगाचा जनक, विश्वाचा पालक असा सामर्थ्यशाली आहे.

21 AUGUST 2015 FRIDAY

(233-132) WK 34

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

JULY - 2015

सर्वज्ञो यो यश्च हि सर्वः सकलो यो
यश्चानन्दोऽनन्तगुणो यो गुणधामा।
यश्चाव्यक्तो व्यस्तसमस्तः सदसद्यस्
तं संसारध्वान्तविनाशं हरिमीडे ॥३॥

जो सर्वज्ञ, सर्वस्वरूप, आनंदस्वरूप, अनंत गुणांनी युक्त आहे. त्रिगुणात्मक माया हे ज्याचे धाम (उपाधि स्थान) आहे. जो अव्यक्त आहे. व्यष्टिरूपही आहे. समष्टिरूपही आहे. जो सत आहे, असत आहे. म्हणजेच कारणस्वरूपही आहे व कार्यस्वरूपही (असत) आहे - सदसच्चाहमर्जुन।

हे संपूर्ण विश्व कार्य (Finished Product) आहे. आणि प्रत्येक कार्याच्या मागे कारण असतेच. या प्रकार विश्वाचा कर्ता मानव असणे शक्य नाही. सूर्य, चंद्र, ग्रह, नक्षत्रे, खगोल, भूगोल, पशु पक्षी, वृक्ष वेली पर्वत नद्या हे सर्व कोणी निर्माण केले? कोणीतरी कर्ता असलाच पाहिजे. कर्त्याशिवाय कार्य घडणे शक्य नाही. आणि त्यामुळेच आमच्या ऋषींनी शास्त्रांनी त्याला नाव दिले - परमेश्वर.

कार्य करण्यासाठी त्याविषयी ज्ञान हवे. तो नर सर्वज्ञ आहे तो सर्वविद देखील आहे. म्हणजे तो सामान्यरूपाने व विशेषरूपाने सर्व काही जाणतो कारणही तोच आहे व कार्यही तोच आहे. विश्वातील प्रत्येक पदार्थांच्या रूपाने तोच नटलेला आहे.

सर्व खल्विदं ब्रह्म। असे वेद त्याचे वर्णन करतात. तो श्रीहरि आनंदस्वरूप आहे. रसो वै सः। नित्यं विज्ञानमानन्दं ब्रह्म।

तो सर्वज्ञ, सर्वशक्तिमान, सर्वैश्वर्यसंपन्न, सर्वसाक्षी आहे. Omnipresent, Omnipotent, Omniscient

तो गुणधाम आहे. त्रिगुणांनी संपन्न असणारी माया हे ज्याचे धाम आहे गृह / उपाधिस्थान आहे.

© www.madraveeraghuveer.com

गीता सांगते- मम योनिर्महद्ब्रह्म, तस्मिन् गर्भं दधाम्यहम्।
तो परमात्मा अव्यक्त आहे. बहिरिन्द्रियांनी त्याचे
8 ज्ञान होऊ शकत नाही. कारण त्यासाठी शब्द, स्पर्श,
रूप, रस, गंध यापैकी काही गुण असावे लागतात.
9 परंतु ते गुण परमात्म्याच्या ठिकाणी नाहीत. तो कसा
10 आहे? अशब्दमस्पर्शमरूपमव्ययं तथाऽरसं नित्यम्
अगन्धवच्च यत्।
हे परमात्मतत्त्व अव्यय आहे, नित्य आहे.
11 तो व्यस्तसमस्तः आहे. व्यष्टि — समष्टि
12 व्यस्त — पृथक्‌रूपाने, व्यष्टिरूपाने, भिन्नरूपाने
समस्त — अभिन्नरूपाने, समष्टिरूपाने, एकरूपाने विराजमान
1 व्यस्त — फेस, बुडबुडे, तरंग हे जलाचे व्यस्त रूप तर
समस्त — समुद्र हे त्याचे समस्त रूप आहे.
तत्त्वतः दोन्ही एकच आहेत.
2 व्यस्त — स्त्री-पुरुष, पशु-पक्षी, कीट-पतंग, तू-मी
3 समस्त — परब्रह्म परमात्मा
सत — अविनाशी, परमसूक्ष्म, कारणरूप परब्रह्म
असत — नाशवंत, स्थूल, घटपटादि कार्यरूपही तोच आहे

SUNDAY 23

© www.madhaveeraghuveer.com

न तत्र सूर्यो भाति न चन्द्रतारकं
नेमा विद्युतो भान्ति कुतोऽयमग्निः।
तमेव भान्तमनुभाति सर्वं
तस्य भासा सर्वमेवं विभाति॥

यस्मादन्यन्नास्त्यपि नैवं परमार्थं
दृश्यादन्यो निर्विषयज्ञानमयत्वात्।
ज्ञातृज्ञानज्ञेयविहीनोऽपि सदा ज्ञस्
तं संसारध्वान्तविनाशं हरिमीडे॥४॥

सच्चिदानंदस्वरूप श्रीहरीशिवाय या जगात दुसरे काही नाही. जे काही दिसते ते तत्वतः सत्य नाही. परमात्मा हा निर्विषय ज्ञानस्वरूप असल्याने दृश्य वस्तुपेक्षा वेगळा आहे. यावर आक्षेप घेतला जातो की जर तोच या जगात रूपाने नटलेला आहे तर तो वेगळा कसा? आणि जर हे जग डोळ्याने दिसते तर तो परमात्माहि दिसायला हवा. मग त्याला अदृश्य अव्यक्त कसे म्हणता?

आपल्याला जग दिसते म्हणजे केवळ नामरूपात्मक विकार दिसतात. परंतु विकार हे सत्य नसतात. विकारांच्या मुळाशी असणारे अधिष्ठानभूत सच्चिदानंद परमात्मतत्व सत्य असते. आणि ते बाह्य इंद्रियांनी प्रतीतीला येत नाही. परमात्मस्वरूप हे ज्ञानः संवेद्य आहे. आणि ते दृश्य वस्तु असूच शकत नाही. सुख/दुःख तरी कुठे दिसतात? तो अदृश्यच आहेत. घटपटादि सर्व विषय ज्ञानाने प्रकटतात म्हणून या (भौतिक) ज्ञानाला सविषय ज्ञान म्हणतात. आणि ज्याच्या सत्तेने/अस्तित्वाने/स्फुरणाने विषयज्ञान होते तो परमात्मा स्वतः निर्विषयज्ञानस्वरूप आहे. व्यवहारात आपण सूर्याला स्वयंप्रकाश म्हणतो.

त्रिपुटी —— ज्ञाता —— ज्ञानाचा आश्रय
ज्ञान —— विषयाकार अंतःकरणवृत्तिः)
ज्ञेय —— घटपटादि वस्तु (दृश्य पदार्थ)

या सर्वांहून तो निराळा असून देखील तो सर्व विषयांना प्रकाशित करत असतो. असा तो 'ज्ञ' आहे.

अर्थात जग हेच काल्पनिक आहे त्यामुळे परमेश्वराचे जगत् कारणत्वही सत्य मानता येत नाही, ही देखील औपचारिकताच आहे. सत् + चित् + आनंद = हरि - - -

© www.madhaveeraghunee.com

आचार्येभ्यो लब्धसुसूक्ष्माच्युततत्त्वा
वैराग्येणाभ्यासबलाच्चैव द्रढिम्ना।
भक्त्यैकाग्र्यध्यानपरा यं विदुरीशं
तं संसारध्वान्तविनाशं हरिमीडे॥५॥

तो अच्युत असा परमेश्वर अत्यंत सूक्ष्म आहे. त्याचे तत्त्व म्हणजे यथार्थ रूप कसे समजावून घ्यायचे?

ज्यांनी हे तत्त्व विरक्त तत्त्वज्ञ आणि भगवद्भक्त अशा आचार्यांकडून नीट समजून घेतले आहे. शिवाय स्वतःच्या अंगी दृढ वैराग्य धारण केले आहे. मननाने आणि निदिध्यासामुळे ज्यांना आत्मस्वरूपाच्या अभ्यासाचे पाठबळ लाभले आहे. भक्तियुक्त अंतःकरणाने जे निरंतर परमात्मस्वरूपाचे एकाग्रतेने ध्यान करतात तेच परमात्मस्वरूपाला जाणू शकतात.

सारांश, शुद्ध भक्ती, विवेकयुक्त तीव्र वैराग्य, योग्य आणि अधिकारी सद्गुरूंची कृपा, आत्मस्वरूपाचे श्रवण – मनन – निदिध्यासन – या साधनांनी त्या विश्वनिर्मात्या विश्वंभराचे ज्ञान होऊ शकते.

© www.madhavpeacher.com

शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मनः।

26 AUGUST 2015 WEDNESDAY

1 June 2021

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

JULY - 2015

(238-127) WK 35

प्राणानायम्योमिति चित्तं हृदि रुद्ध्वा
नान्यत्स्मृत्वा तत्पुनरत्रैव विलाप्य।
क्षीणे चित्ते भादृशिरस्मीति विदुर्यं
तं संसारध्वान्तविनाशं हरिमीडे॥६॥

जे प्राणायाम करून इंद्रियांचा व मनाचा निग्रह करतात व ॐ काराच्या मन्द्र स्वराने दीर्घ उच्चार करीत आपल्या अंतःकरणाला हृदयाकाशामध्ये स्थिर करतात. इतर कशाचे स्मरण होऊ देत नाहीत. (न किञ्चिदपि चिन्तयेत्) आणि जर झालेच तर विवेकाने त्याचा परिहार करतात. पुन्हा-पुन्हा अंतःकरणाला परब्रह्मातच लीन करून ठेवतात. अशा रीतीने चित्तातील वृत्तींचा लय झाल्यानंतर 'भादृशि' म्हणजे मीच स्वयंप्रकाश चिद्रूप परमात्मा आहे या परमात्मस्वरूपाचा साक्षात्कार होतो. (हेच श्रीहरिचे दर्शन)

यच्छेद् वाङ्मनसी प्राज्ञस्तद्यच्छेज्ज्ञान आत्मनि।
ज्ञानमात्मनि महति नियच्छेत् तद् यच्छेत् शान्त आत्मनि॥

प्रथम वाणी संयम - मौन धारण करावे. नंतर त्वचा, श्रुति, चक्षु, रसना, घ्राण या इंद्रियांचा संयम - विषयांपासून इंद्रियांना परावृत्त करावे. प्रथम निषिद्ध विषयांचा त्याग - नंतर विहित विषयांपासून परावृत्त व्हावे. इंद्रियांचे व्यापार आवरावेत. एकांतात शांत, स्थिर आसनात बसावे. एवढे करून देखील मनाची धाव सुरूच राहिली ते चंचल असेल तरी त्याला आत्मस्वरूपाकडे वळवावे. वित्त वैभव, पुत्र-मित्र-कलत्र, देह-इंद्रिये-मन ही सर्व आत्म्याहून निराळी आहेत. ती आत्मा होऊ शकत नाहीत. ती नाशवंत आहेत. आणि आत्मा तर अविनाशी आहे. असा विचार करत मनाला त्या सच्चिदानंद, साक्षीरूप, चैतन्यस्वरूप आत्म्यामध्ये स्थिर करावे. शेवटी मी तेच आहे त्याच्याहून निराळा नाही. ते माझ्याहून निराळे नाही. विश्व त्याहून निराळे नाही. तो विश्वाहून निराळा नाही. अशा रीतीने विश्व-मी आणि ब्रह्म सर्व एकरूप आहोत. अशी भावना करावी. ही भावना परिपूर्ण झाली की मग ध्याता-ध्यान-ध्येय ही त्रिपुटी मावळते व ध्यान करणारा परब्रह्मरूप होऊन जातो.

यं ब्रह्माख्यं देवमनन्यं परिपूर्णं
हृत्स्थं भक्तैर्लभ्यमजं सूक्ष्ममतर्क्यम्।
ध्यात्वात्मस्थं ब्रह्मविदो यं विदुरीशं
तं संसारध्वान्तविनाशं हरिमीडे ॥८॥

मी ज्याची ब्रह्म म्हणून स्तुति करत आहे, तो भगवान विष्णु **देव** आहे म्हणजेच द्युतियुक्त अर्थात स्वयंप्रकाश आहे. तोच आपल्या प्रकाशाने सर्वांना प्रकाशित करतो. तो **अनन्य** आहे. त्याच्यासारखा दुसरा नाही. तो एकरूप आहे. तो सर्वस्वरूप आहे म्हणजेच कोणतीही गोष्ट त्याच्यापासून निराळी नाही. तो परिच्छेदशून्य आहे. भौतिक गोष्टींमध्ये भेद असतो. घट म्हणजे पट नाही. पट म्हणजे घट नाही. गुलाब म्हणजे मोगरा नाही. हा जो भेद आहे तो वस्तुकृत परिच्छेद आहे. परिच्छेद म्हणजे मर्यादित / सीमामाप. या विश्वात उत्पन्न होणाऱ्या व एकमेकांपासून भिन्न असणाऱ्या सर्व वस्तूंना परिच्छेद असतो. परंतु परब्रह्म मात्र **सर्वरूपाने नटलेले** असल्याने व सर्व विश्व तत्वत: परमात्मस्वरूप असल्याने तिथे परिच्छेद नाही. म्हणून तो अनन्य आहे. तो सदासर्वकाळ सर्वत्र ओतप्रोत भरला आहे. ∴ काळपरिच्छेद नाही. सर्वच ठिकाणी विराजमान असल्याने देशपरिच्छेद नाही. सारांश काय तर ते परब्रह्म **त्रिविधपरिच्छेदशून्य** आहे.

तो सर्वांच्या हृदयात राहतो. पण भक्तांनाच त्याचे दर्शन होऊ शकते. सर्वस्य चाहं हृदि सन्निविष्टो। म्हणून त्याला **भक्तैर्लभ्यम्** म्हटले आहे. जन्म नसल्याने तो अज आहे. तो परम **सूक्ष्म** (अणुरणीया थोकडा) आहे. त्याची कल्पना, चिंतन करता येत नाही. बाह्य इंद्रिये तर नाहीच परंतु **अंतर्क्य** अंतरिन्द्रियही त्याचे ग्रहण करू शकत नाहीत. तो अगोचर आहे. सूक्ष्म आहे. आपल्याच देहात विराजमान असणाऱ्या त्या परमात्मतत्वाचे चिंतन जे योगी करतात ते **ब्रह्मवेत्ते** होतात. सर्वांचे नियमन करणारा तो **ईश** आहे.

© www.madhaveeraghuveer.com

मात्रातीतं स्वात्मविकाशात्मविबोधं
ज्ञेयातीतं ज्ञानमयं हृद्युपलभ्यम्।
भावग्राह्यानन्दमनन्यं च विभुर्यं
तं संसारध्वान्तविनाशं हरिमीडे ॥८

पंच ज्ञानेंद्रियांचे पंच विषय आहेत: त्यांना तन्मात्रा म्हटले जाते - शब्द स्पर्श रूप रस गंध. विश्वाचे ज्ञान यांच्या मार्फत होते. परंतु परमात्मा मात्र यांच्या पलीकडचा म्हणजेच **मात्रातीत** आहे परंतु इंद्रियांनी तो कळत नाही असेही पूर्णपणे म्हणता येणार नाही. कारण चैतन्याने प्रकाशित अशा अंतःकरणामध्ये बुद्धी मध्ये त्याचा साक्षात्कार होऊ शकतो. परंतु तरीही तो बुद्धिगम्य नाही. त्या पलीकडे तो आहे. तो ज्ञानमय आहे आपल्या बुद्धित तो प्रकाशतो. त्याची उपलब्धि होते.

वरवर पाहता इथे विरोधाभास वाटेल परंतु तसे तो नाही. आत्मस्वरूपाच्या साक्षात्कारासाठी सामान्य बुद्धीची नाही तर सूक्ष्म एकाग्र बुद्धीची अपेक्षा असते.

श्रुती सांगते — दृश्यते त्वग्र्यया बुद्ध्या।

अर्थात शुद्ध, निर्मल, सूक्ष्म बुद्धितच आत्मतत्व प्रकाशू शकते. तो परमात्मा **भावग्राह्य** आहे. भक्तीनेच त्याचा साक्षात्कार होऊ शकतो. भक्तपणाने तो **आस्ते भाति** रूपांनी तो प्रत्ययाला येतो.

तो नित्य, निरतिशय, आनंदरूप आहे **अनन्य** आहे **अद्वितीय** आहे. **एकरूप** आहे

यद् यद् वेद्यं वस्तुसतत्त्वं विषयाख्यं
तद् तद् ब्रह्मैवेति विदित्वा तदहं च ।
ध्यायन्त्येवं यं सनकाद्या मुनयोऽजं
तं संसारध्वान्तविनाशं हरिमीडे ॥४॥

शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे पांच विषय जीवाला बंधनात टाकतात. संसारात गुंतवतात. संस्कृतमध्ये 'सि' धातुचा अर्थ बांधणे, शिवणे असा आहे. त्याला 'वि' हा विशेषत्व दर्शविणारा उपसर्ग लागल्यामुळे विषिणोति इति विषयः। जो विशेषत्वाने जीवाला संसाराशी बांधून टाकतो, शिवून टाकतो तो विषय। यापैकी एक एक विषय देखील घातक आहे.

शब्दादिभिः पंचभिरेव पंच
पंचत्वमापुः स्वगुणेन बद्धाः।
कुरंगमातंगपतंगमीन
भृंगाः नरः पंचभिरंचितः किम्॥

कुरंग (हरिण) शब्दाने, मातंग (हत्ती) स्पर्शाने, पतंग रूपाने, मीन (मासा) रसाने तर भृंग (भुंगा) वासाने बद्ध होतो. ह्यापैकी एक विषय इतका अनर्थकारी आहे आणि माणूस तर या पाचही विषयांना बळी पडतो व बांधला जातो. विशेषेण सिन्वन्ति इन्द्रियाणि मनश्च। इंद्रिय आणि मन त्यात बुडून जाते तो विषय। खरे तर या जगात जे वेद्य विषय आहेत ते ब्रह्मस्वरूपच आहेत - रज्जु-सर्प न्याय त्यामुळेच सनकादिक ऋषी देखील सर्व दृश्य विषयांना ब्रह्मच मानतात. त्याच दृष्टीने त्यांच्याकडे पाहतात. ते सर्व विषय तत्त्वतः ब्रह्म आहेत असे जाणतात व तेच ब्रह्म मी आहे असे मानून त्या श्रीहरिचे ध्यान करतात. अशा संसाराला कारणीभूत असणाऱ्या अज्ञानरूपी अंधकाराचा निरास करणाऱ्या हरीची मी स्तुति करत आहे.

© www.madhaveeraghuveer.com

२ जून २०२१

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

JULY - 2015

31 AUGUST 2015 MONDAY

(243-122) WK 36

यद् यद् वेद्यं तत्तदहं नेति विहाय
स्वात्मज्योतिर्ज्ञानमयानन्दमवाप्य।
तस्मिन्नस्मीत्यात्मविदो यं विदुरीशं
तं संसारध्वान्तविनाशं हरिमीडे ॥१०॥

सर्व दृश्य विषय (स्त्री पुत्र देह इंद्रिये मन बुद्धि) वेद्य आहेत. ते ज्ञानाचा विषय होऊ शकतात. मात्र आत्मा हा ज्ञानाचा विषय होऊ शकत नाही तोच ज्ञाता आहे. तो ज्ञेय कसा असेल? जो सर्वांना जाणतो, त्याला कोणी जाणावे?

तात्पर्य आत्मा हा ज्ञाता आहे व त्याच्याव्यतिरिक्त असलेले सर्व काही ज्ञेय आहे. ज्ञेय आहे तेच दृश्य किंवा वेद्य आहे जे आत्म्यापेक्षा भिन्न आहे ते सर्व भासमान / काल्पनिक आहे. हे जाणून ज्ञानी लोक त्याचा त्याग करतात आणि जो स्वयंप्रकाश, ज्ञानस्वरूप, आनंदरूप असा आत्मा त्याचा आश्रय प्राप्त करून घेतात. म्हणूनच त्याला यथार्थ रूपाने जाणतात.

सर्वांतर्यामी, स्वयंप्रकाश, आनंदघन आत्मा म्हणजेच मी आहे याचा साक्षात्कार त्यांना होतो म्हणूनच त्यांना आत्मविद म्हणतात. ही 'आत्मज्ञानी' च्या वरची अवस्था आहे. असे आत्मवेत्ते ज्या जगदीशाला जाणतात त्या श्रीहरीची मी स्तुति करतो.

© www.madhaveeraghuveer.com

हित्वा हित्वा दृश्यमशेषं सविकल्पं
मत्वा शिष्टं भादृशिमात्रं गगनाभम् ।
त्यक्त्वा देहं यः प्रविशत्यच्युतभक्त्या
तं संसारध्वान्तविनाशं हरिमीडे ॥

आत्मज्ञान दृढ झाल्याशिवाय सर्व संसारदुःखांची निवृत्ती होणार नाही, म्हणून तत्वजिज्ञासु लोक हा प्रपंच नाशवंत आहे ही गोष्ट लक्षात घेतात. दृश्य प्रपंचा पासून आपले मन परावृत्त करून केवळ शुद्ध चित्स्वरूप आनंदमय अशा परमात्मतत्वाच्या ठिकाणी लावतात.

हित्वा हित्वा अशा विकल्पांनी प्रपंचाची क्षणभंगुरता मनावर ठसवली आहे. व आकाशासारख्या निर्मळ, तरल अशा परमात्मतत्वावर मन केंद्रित करायला सांगतात.

देह म्हणजे आत्मा नव्हे. कारण तो नश्वर आहे. इंद्रिये म्हणजे आत्मा नव्हे. कारण ती ज्ञानाची साधने आहेत. मन म्हणजे आत्मा नव्हे कारण ते केवळ सुखदुःखाच्या ज्ञानाचे साधन आहे. बुद्धि हा केवळ अंतःकरणचतुष्टयाचा एक भाग आहे. तो आत्मा होऊ शकत नाही. स्त्री, पुत्र, मित्र हे कितीही प्रिय असले तरी ते नित्य आत्मा नाहीत तर ती आनंदाची साधने आहेत. वित्तवैभव तर दूरच कारण त्याने फक्त सुखाची साधने विकत घेता येतात. —— या सर्वांचा निषेध केल्यानंतर निषेधाचा अवधि म्हणून जो शिल्लक राहतो निषेधकर्ता म्हणून जो असतो, तोच आत्मा. तो निरपेक्ष प्रेमाचा विषय असतो तो स्वयंप्रकाश, चित्स्वरूप आहे. आकाशासारखा सर्वव्यापी आहे.

© www.madhaveeraghuveer.com

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

AUGUST - 2015

सर्वत्रास्ते सर्वशरीरी न च सर्वः
सर्वं वेत्त्येवेह न यं वेत्ति हि सर्वः।
सर्वत्रान्तर्यामितयेत्थं यमयन् यस्
तं संसारध्वान्तविनाशं हरिमीडे ॥१२॥

सर्वांच्या अंतर्यामी तो आत्मस्वरूपाने सर्वत्र आहे. सर्वच त्याचे शरीर आहे, पण तो सर्व नव्हे. अधिष्ठानरूपाने तो सर्वत्र ओतप्रोत भरला आहे. तो सर्वांना जाणतो पण सर्व त्याला जाणत नाहीत. तो सर्वांचे नियमन करतो सर्वांना आपापल्या कार्यामध्ये प्रवृत्त करतो त्या श्रीहरीची मी भक्तिपूर्वक स्तुति करतो.

बृहदारण्यक — जनक राजा — महायज्ञ — याज्ञवल्क्य
सहस्र गायी — ब्रह्मवेत्ता — शास्त्रार्थ —
आस्वल — आर्तभाग — भुज्यु — कहोल — उद्दालक
गार्गी — संवाद — सर्वांतरयामी कोण?

[अपूर्ण]

© www.madhaveeraghuveer.com

3 June 2021



सर्वं दृष्ट्वा स्वात्मनि युक्त्या जगदेतद्
दृष्ट्वात्मानं चैवमजं सर्वजनेषु ।
सर्वात्मैकोऽस्मीति विदुर्यं जनहृत्स्थं
तं संसारध्वान्तविनाशं हरिमीडे ॥१३॥

हे सर्व विश्व आत्मस्वरूपाच्या ठिकाणी आहे व आत्मा हा विश्वामध्ये ओतप्रोत भरला आहे. तत्त्ववेत्ते हे जाणतात

सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि
ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः ॥

वेदांनी प्रामुख्याने प्रतिपादन केलेला व तत्त्ववेत्त्यांनी जाणलेल्या सिद्धान्तानुसार ब्रह्म हे एकमेवाद्वितीय आहे व जीव ब्रह्मरूप आहे.

सुवर्ण व अलंकार यांत तत्त्वतः भेद नाही. अलंकार नाश पावले तरी सुवर्ण असतेच. त्याचप्रमाणे विश्व हे आत्मस्वरूपातून अभिव्यक्त होते. त्याच्या ज्ञानाने ते प्रतीत होते व अज्ञान गेल्या त्याच्यातच विलीन होते. उत्पत्ति - स्थिति - लय। त्वमेव केवलं कर्तासि। धर्तासि हर्तासि। त्वमेव सर्वं खल्विदं ब्रह्मासि। त्वं साक्षादात्मासि नित्यम्। हे सर्व विश्व भिन्न भिन्न नामरूपांनी प्रत्ययाला येत असले तरी ते सत्य मानता येत नाही. कारण त्याला बाध आहे. कालांतराने ते नाश पावते. परंतु ते डोळ्यांना दिसत असल्यामुळे खोटे म्हणायलाही धजावत नाही.

याचे उत्तर असे की या दृश्य पदार्थांच्या चैतन्याशी संबंध आल्यामुळेच त्यांचे भान असते. म्हणूनच चैतन्याला दृग्, ज्ञान किंवा प्रकाश म्हणतात. रज्जु-सर्प न्यायानुसार हे दोन वेगळे पदार्थ नाहीत. त्याचप्रमाणे आत्मा विश्वरूपाने निःसृत असतो तेव्हा विश्व व आत्मा हे भिन्न नसतात तत्त्वतः ते एकच असतात.

© www.madhaveeraghuveer.com

सर्वत्रैकः पश्यति जिघ्रत्यथ भुङ्क्ते
स्प्रष्टा श्रोता बुध्यति चेत्याहुरिमं यम्।
साक्षी चास्ते कर्तृषु पश्यन्निति चान्ये
तं संसारध्वान्तविनाशं हरिमीडे ॥१४॥

'आब्रह्मकीट' म्हणजेच सर्व स्थावर जंगम पदार्थात तोच एक आत्मा भरलेला आहे. तो एकरूप असून अनेक रूपांनी भासतो. तोच डोळ्यांनी पाहतो, नाकाने वास घेतो, मुखाने घास घेतो, त्वचेने मृदु कठीण जाणतो कानाने ऐकतो. बुद्धीने लक्षात घेतो. तोच सर्व इंद्रियांनी सर्व हालचाली करतो. तोच श्रोता, मन्ता, कर्ता, ज्ञाता आहे असे सर्वजण मानत असले तरी, ते त्याचे सोपाधिक स्वरूप आहे. मात्र विवेकी तत्त्वज्ञ मात्र त्याचे निरुपाधिक स्वरूप लक्षात घेतात. तो केवळ साक्षी आहे असे मानतात. तो देह, इंद्रिये, मन, बुद्धि या सर्वांत राहून तो त्यांना आपापल्या कार्यामध्ये प्रवृत्त करत असतो. तो स्वतः काही करत नाही. तो केवळ त्यांची कार्ये पाहत असतो, प्रकाशित करतो पण तो अकर्ता आहे. अशा अज्ञानाचा निरास करणाऱ्या श्रीहरीची स्तुती मी करत आहे.

© www.madhaviraghuveer.com

उपाधिमुक्त आत्म्याच्या ठिकाणी जीवभाव आला की कर्तृत्व-भोक्तृत्व येते. गुरुकृपेने, ईश्वरकृपेने आत्म्याचा जीवभाव निमाला की तोच परब्रह्म होतो.

पश्यन् शृण्वन्नत्र विजानन् रसयन् सन्
जिघ्रन् बिभ्रद्देहमिमं जीवतयेत्थम्।
इत्यात्मानं यं विदुरीशं विषयज्ञं
तं संसारध्वान्तविनाशं हरिमीडे ॥१५॥

पाहत असताना, ऐकताना, जाणून घेताना, रस चाखताना, वास घेताना अनेक क्रिया तो देहात करत आहे असे वाटते म्हणून त्याला सर्व विषयांचा ज्ञाता, कर्ता असे म्हणतात. परंतु तत्त्वतः तो जीव नसून जीवाचा अधिष्ठाता ईश आहे. ही तत्त्ववेत्त्यांची दृष्टी आहे.

नैव किंचित्करोमीति युक्तो मन्येत तत्त्ववित्
पश्यन् शृण्वन् स्पृशन् जिघ्रन् अश्नन् गच्छन् स्वपन् श्वसन्॥

काही ठिकाणी वेद आत्म्याला कर्ता, भोक्ता म्हणतात तर काही ठिकाणी तो कर्ताही नाही, भोक्ताही नाही असे सांगतात. त्यामुळे ही विधाने परस्परविरोधी वाटतात.

त्यावर उत्तर असे की, आत्मा हा औपाधिकरूपाने कर्ता, भोक्ता असा आहे (देहाच्या मर्यादेमुळे आलेली उपाधि) तर स्वाभाविकरूपाने तो कर्ताही नाही व भोक्ताही नाही. त्यामुळे स्वाभाविकरूपाने व उपाधिरूपाने दोन्ही पक्ष बरोबर आहेत. परंतु ते सत्य मात्र नाहीत.

त्यापैकी स्वाभाविक प्रतीति हीच सत्य आहे.

स्फटिक स्वभावतः पांढरा शुभ्र, स्वच्छ असतो. पण तो निळ्या मखमली कापडावर ठेवला तर  निळा वाटतो. लाल जास्वंदीच्या फुलावर लाल वाटतो परंतु या छटा तात्पुरत्या आहेत. त्या स्फटिकाच्या स्वभावतः असणारा शुभ्रपणा, स्वच्छपणा हा धर्म आहे व तोच सत्य आहे. जलाचे उष्णत्व हे औपाधिक आहे तर शीतत्व हे स्वाभाविक असते

आत्मा हा जीवरूपाने या देहात प्रवेश करतो. तो देहक्रियांचा आधार बनतो. त्यामुळे तो श्रोता, ज्ञाता, रसज्ञ गंधज्ञ असल्यासारखे वाटते

वैश्वानर - तैजस - प्राज्ञ



| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

AUGUST - 2015

जाग्रत् दृष्ट्वा स्थूलपदार्थानथ मायां
दृष्ट्वा स्वप्नेऽथापि सुषुप्तौ सुखनिद्राम् ॥
इत्यात्मानं वीक्ष्य मुदास्ते च तुरीये
तं संसारध्वान्तविनाशं हरिमीडे ॥१६॥

परमात्मा सर्व प्राण्यांच्या देहामध्ये जीवरूपाने प्रविष्ट होऊन जागृत अवस्थेमध्ये सर्व स्थूल पदार्थांना पाहतो. स्वप्नामध्ये मायिक प्रपंचाला पाहतो आणि सुषुप्ति अवस्थेत सुखनिद्रेचा आनंद अनुभव घेतो. शेवटी तुरीय अवस्थेत आत्मस्वरूपाचा साक्षात्कार करून घेतो. आणि सर्व विषयांपासून अलिप्त राहतो.

| | | | |
|---|---|---|---|
| जाग्रत | स्थूल | वैश्वानर | अ |
| स्वप्न | सूक्ष्म | तैजस | उ |
| सुषुप्ति | कारण | प्राज्ञ | म |
| तुरीय | महाकारण | | अर्धमात्रा |

© www.madhaveeraghuveer.com

यस्मात् शुद्धोऽप्यक्षर एको गुणभेदान्
नानाकारान् स्फाटिकवद् भाति
भिन्नाश्छिन्नश्चायमजः कर्मफलैर्यस्
तं संसारध्वान्तविनाशं हरिमीडे ॥१०॥

आत्मा परमात्मा तत्वतः शुद्ध, अज, अक्षर व एकरूप आहे. तरीही उपाधिभेदाने अनेक आकारांमध्ये प्रतीत होतो. स्फटिकाप्रमाणे त्या त्या रंगाच्या सान्निध्यात तो तसतसा भासतो. देहाच्या लहानमोठ्या आकारांमुळे तो परिच्छिन्न, परिमित भासतो. हत्ती-मुंगी, स्त्री-पुरुष, लघु-हडकुळा, उंच-बुटका असा भासतो. तो सुखी-दुःखी नसतो. तो अज-जन्मविरहित, शुद्ध-पापपुण्यविरहित सुख-दुःख विरहित आहे. तो अक्षर (अविनाशी) आहे. अद्वितीय आहे, अशा श्रीहरीची मी स्तुति करतो - -

आत्मा जर सर्वांचा एकच आहे तर या जगात सगळे सुखी, संतुष्ट असायला हवेत. पण तसे दिसत नाही. पंचमहाभूते व त्रिगुण यापासून ही सृष्टी व शरीरे निर्मिलेली आहेत. आत्मा हा देहरूप उपाधिशी संलग्न असल्याने त्याच्या ठिकाणी हे सारे धर्म आहेत असे भासत असतात. नाही आकार, भेद, परिच्छेद हे सारे शरीरास [illegible] आहेत. आत्म्याला [illegible] आकार नसतो परंतु इंधनाच्या आकाराप्रमाणे तो अनुभवाला येतो. ओंडका, लाकडे, काडी - - - -

स्वभावतः स्वच्छ असणारा स्फटिक उपाधिच्या सान्निध्यामुळे भिन्न भिन्न भासतो.

अंतःकरणे ही असंख्य व भिन्न भिन्न असल्याने एक सुखी असला तरी दुसरा दुःखी असू शकतो.

ब्रह्मा विष्णू रुद्रहुताशो रविचन्द्रा
विन्द्रो वायुर्यज्ञ इतीत्थं परिकल्प्य
एकं सन्तं यं बहुधाहुर्मतिभेदात्
तं संसारध्वान्तविनाशं हरिमीडे ॥१२॥

उपाधिभेदाने एक आत्माच अनेक देवतांच्या रूपाने नटलेला आहे व तो अनेक कार्य करत आहे. तोच ब्रह्मदेवाचे रूप धारण करून सर्व जगाची निर्मिती करतो, विष्णुरूप होऊन जगाचे प्रतिपालन करतो. स्वतः सात्त्विक असूनही तमोगुणप्रधान साधनांचा अंगीकार करून प्रलयकाळी शिवरूप धारण करून विश्वसंहारही करतो.

अग्नि, सूर्य, चंद्र, इंद्र, वायु आणि यज्ञ या देवतांच्या रूपांनी तोच नटलेला आहे. असा हा परमात्मा तत्त्वतः एक असूनही उपाधिच्या भिन्नतेमुळे त्याच्याबद्दल अनेक कल्पना केल्या जातात.

अथर्वशीर्ष — त्वं ब्रह्मा त्वं विष्णु त्वं वायुस्त्वं चंद्रमा त्वं ब्रह्मभूर्भुवःस्वरोम्।

सत्यं ज्ञानं शुद्धमनन्तं व्यतिरिक्तं
शान्तं गूढं निष्कलमानन्दमनन्यम् ।
इत्याहादौ यं वरुणोऽसौ भृगवेऽजं
तं संसारध्वान्तविनाशं हरिमीडे ॥१७॥

तो सर्वकाळ अस्तित्वात आहेच. तो नाही असे नाहीच. कोणत्याही साधनाने त्याचा बाध होऊ शकत नाही. तो सत्य आहे. तो चेतन व प्रकाशरूप म्हणजेच ज्ञानस्वरूप आहे. तो शुद्ध आहे. म्हणजेच केवळ आहे. पाप-पुण्य, सुख-दुःख, कर्तृत्व-भोक्तृत्व इ. सर्व धर्मांपासून अलिप्त आहे. असा हा आत्मा अनन्त असीम आहे. अमर्याद, परिच्छेदशून्य आहे. तो सर्वकाळी, सर्वदेशी विराजमान असल्याने त्याला देश-काल-वस्तु मर्यादा नाही. तो सर्व काळी, सर्वस्थळी, सर्व वस्तूंच्या रूपाने नटलेला आहे.

तो व्यतिरिक्त आहे. म्हणजेच पंचकोशांच्या पलीकडे असून तो त्यांचा साक्षी आहे. शान्त म्हणजे ज्याच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे चांचल्य नाही. गूढ म्हणजे न आकळणारा, रहस्यमय, (वाणी-मनाने) आकळण्यास अवघड असा आहे. निष्कल म्हणजे कलारहित, निरवयव! ज्याचे तुकडे करता येत नाहीत.

आनंद म्हणजे निरतिशय, निरपेक्ष अशा प्रेमाचे स्थान! परमप्रिय! अनन्य म्हणजे एकरूप, अद्वितीय.

वरुण नावाच्या तत्त्ववेत्त्या महर्षीने आपल्या भृगु नावाच्या मुलाला, ज्या तत्त्वाचे वर्णन 'अज' म्हणून करून दिले तो अज, अनादि भगवान श्रीहरि त्याची मी स्तुति करत आहे.

© www.madhaveeraghuveer.com

कोशानेतान् पञ्च रसादीनतिहाय
ब्रह्मास्मीति स्वात्मनि निश्चित्य दृशिस्थम्।
पित्रा शिष्टो वेद भृगुर्यं यजुरन्ते
तं संसारध्वान्तविनाशं हरिमीडे ॥२०॥

कोश म्हणजे आच्छादन. तलवारीला झाकून ठेवणाऱ्या म्यानाला कोश म्हटले जाते. आत्मस्वरूपाला झाकून टाकणारे पाच कोश आहेत. अन्न, प्राण, मन, विज्ञान, आनंद


अन्नमय —— रसरक्तादि धातु —— जन्म जरा मृत्यु
प्राणमय —— पंचप्राण, कर्मेंद्रिये —— क्रिया व हालचाल
मनोमय —— मन व ज्ञानेंद्रिये —— विचार, सुख दुःख, इच्छा
विज्ञानमय —— बुद्धि व ज्ञानेंद्रिये —— निश्चय करणे भीति
आनंदमय —— अज्ञानरूप कारणदेह — स्थूल/सूक्ष्म विश्वप्रपंचाचे कारण

© www.madhaveeraghuveer.com



The Rasa Lila dance




© www.madhaveeraghuveer.com

